दैनिक

# चकमक

संपादक : शामसुंदर चितोडा    कार्यकारी संपादक : कैलास फुलारी



सर्व वाचक, जाहिरात, हितचिंतक यांना दै.चकमक परिवाराकडून विजय दशमीच्या हार्दिक शुभेच्छा

❁ वर्ष : ०१ ले ❁ ❁ अंक : ७९ ❁ ❁ मंगळवार २० ऑक्टोबर २०२६ ❁ ❁ जालना ❁ ❁किंमत : २ रूपये ❁ ❁पृष्ठे : ४ ❁

◎Volume 01◎ ◎ Issue 79 ◎ ◎ Thusday, Date : 20 October 2026 ◎ ◎ Jalna ◎ ◎Price Rs. 2 ◎ ◎Pages 4 ◎




# भक्तीच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक विचार आणि नव्या पिढीला संस्कारांची शिदोरी देणे, हाच या उपक्रमामागील आमचा प्रामाणिक प्रयत्न : लोणीकर

**आमदार बबनराव लोणीकर यांच्या संकल्पनेतून शहरातील राष्ट्रमाता जिजाऊ दुर्गामाता नवरात्र महोत्सवातील कीर्तन सोहळ्याला आली रंगत**

**आदिशक्तीच्या भक्तीतून संस्कारांचा जागर, नारीशक्तीचा सन्मान हाच खरा धर्म : ह.भ.प. प्रकाश महाराज साठे**







परतूर : आमदार बबनरावजी लोणीकर यांच्या संकल्पनेतून आणि राहुल भैया लोणीकर मित्रमंडळाच्या वतीने आयोजित राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्रोत्सवात कीर्तनाच्या माध्यमातून भक्ती, संस्कार आणि समाजप्रबोधनाचा जागर करण्यात येत आहे. कीर्तनसेवेत ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांनी संत एकनाथ महाराजांच्या 'अनादि अंबिका भगवती, बोध परडी घेऊनी हाती, पोत ज्ञानाचा पाजळती, उदो उदो भक्त नाचती' या अभंगातून आदिशक्तीची महती, ज्ञानभक्तीचे महत्त्व आणि भक्तिभावाचा आनंद विशद केला. राष्ट्रमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले यांसारख्या कर्तृत्ववान महिलांचे स्मरण करून त्यांनी मातृशक्तीचा सन्मान, कौटुंबिक नात्यांतील विश्वास, परस्पर आदर आणि संयमाचे महत्त्व पटवून दिले. स्त्रीचा सन्मान आणि संस्कारांचे जतन यातूनच सुसंस्कृत समाजाची निर्मिती होते, असा संदेश त्यांनी दिला.

राहुल लोणीकर म्हणाले, नवरात्रोत्सव हा केवळ धार्मिक उत्सव नसून संस्कृतीचे जतन, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि भावी पिढीवर संस्कार करण्याची संधी आहे. राष्ट्रमाता जिजाऊंच्या विचारांतून प्रेरणा घेऊन समाजात बंधुभाव, महिलांविषयी आदर आणि चांगले संस्कार रुजवणे ही काळाची गरज आहे. भक्तीच्या माध्यमातून समाजाला सकारात्मक विचार आणि नव्या पिढीला संस्कारांची शिदोरी देणे, हाच या उपक्रमामागील आमचा एक प्रामाणिक प्रयत्न आहे.

राष्ट्रमाता जिजाऊ नवरात्रोत्सवाच्या माध्यमातून धार्मिक परंपरेसोबतच सामाजिक जाणीव, कौटुंबिक मूल्ये आणि सांस्कृतिक वारसा जपण्याचा राहुल लोणीकर मित्रमंडळाचा प्रयत्न परतूरकरांचे लक्ष वेधून घेत आहे.

यावेळी गणेशराव रोकडे लक्ष्मणराव रोकडे, सौ मंदाताई बबनराव लोणीकर शत्रुघ्न कणसे, संपत टकले, रमेश भापकर, संदीप बाहेकर, प्रकाश चव्हाण, शहराध्यक्ष प्रवीण सातोनकर, शहाजी राक्षे, बाबासाहेब तेलगड, संभाजी वारे सोनू अग्रवाल, सतीश सोनवणे, इजरान कुरेशी, सावता काळे, सुबोध चव्हाण, संभाजी घनवट, शुभम तेलगड, विक्रम धुमाळ, माऊली विष्णू गायकवाड, कृष्णा आरगडे, विजय यादव, राजेश ढवळे, पिंटू काका ढवळे, नितीन जोगदंड, पृथ्वीराज अंभोरे, बंडू मानवतकर, अर्जुन जगताप, अर्जुन राठोड, मुन्ना चितोडा, वसंत राजबिंडे, दादू राक्षे, पद्माकर कवडे, रामप्रसाद गिरी, अजित पोरवाल, अमोल अग्रवाल, अमर बगडिया, प्रमोद राठोड यांच्यासह मोठ्या संख्येने महिला व पुरुष उपस्थित होते.







## परतूरात आज भव्य रावणदहन




परतूर/प्रतिनिधी : शहरातील श्री साईनाथ मंदिर परिसरात मंगळवार, दि. २० ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजताविजयादशमी–दसऱ्यानिमित्त भव्य रावणदहन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात आमदार बबनराव लोणीकर यांच्या हस्ते रावणाच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन होणार आहे. गेल्या ३० वर्षांपासून 'दसरा उत्सव समिती' या परंपरेचे जतन करत आहे. समितीचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार भारुका, उपाध्यक्ष अजय देसाई, सचिव कैलास सोळंके, कोषाध्यक्ष माणिक जैस्वाल व इतर सर्व सदस्य या कार्यक्रमाचे आयोजन करत आहेत.दरवर्षी या सोहळ्यास १० हजारांपेक्षा अधिक भाविक मोठ्या (पान ३ वर)

## पोलीसांची मोठी कारवाई

जालना शहरात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाईचा बडगा उगारला असून, कदीम जालना पोलिसांनी रेल्वे स्टेशन परिसरातील जुन्या बसस्टँडजवळ धडक कारवाई करत एका तरुणाला ताब्यात घेतले आहे. या कारवाईत एक गावठी बनावटीचे पिस्तूल, तीन जिवंत काडतुसे आणि इतर साहित्य असा एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरातील अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. गोपनीय माहितीवरून पोलिसांची कारवाई पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दिनांक १८ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेळके यांना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, रेल्वे स्टेशनजवळील जुन्या बसस्टँड परिसरात एक इसम अवैध शस्त्र घेऊन उभा आहे. त्याच्याकडून गंभीर स्वरूपाचा गुन्हा घडण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाल्यानंतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना याबाबत कळविण्यात आले. पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि (पान ३ वर)






# संपादकीय

## विजया दशमीचा सण, सत्याचा विजय आणि नव्या संकल्पांची सुरुवात

प्रत्येक सण आपल्याला काहीतरी शिकवतो, जीवनाकडे पाहण्याचा नवा दृष्टिकोन देतो आणि नात्यांमध्ये प्रेम, आपुलकी व आनंद निर्माण करतो. अशाच पवित्र आणि मंगलमय सणांपैकी एक महत्त्वाचा सण म्हणजे दसरा अर्थात विजयादशमी !

दसरा हा केवळ एक सण नाही, तर तो सत्याचा असत्यावर, धर्माचा अधर्मावर, चांगुलपणाचा वाईट प्रवृत्तींवर आणि धैर्याचा भीतीवर विजय मिळवण्याचा संदेश देणारा उत्सव आहे. या दिवशी प्रत्येकाच्या मनात आनंद, उत्साह आणि नव्या आशेची पालवी फुटते. घराघरांत पूजा केली जाते, मंदिरांमध्ये भक्तांची गर्दी होते, आपट्याची पाने सोनं म्हणून वाटली जातात आणि एकमेकांना दसऱ्याच्या शुभेच्छा देऊन आनंद साजरा केला जातो. दसरा हा भारतीय परंपरेतील अत्यंत शुभ दिवस मानला जातो. नवीन कामाची सुरुवात करणे, नवीन वस्तू खरेदी करणे, व्यवसायाचा शुभारंभ करणे, शस्त्रपूजन करणे आणि जीवनात नवीन संकल्प करणे यासाठी या दिवसाला विशेष महत्त्व आहे.

विजयादशमी हे नाव कसे पडले?

आश्विन महिन्यातील शुक्ल पक्षातील दशमी तिथीला विजयादशमी किंवा दसरा साजरा केला जातो. 'विजयादशमी' या शब्दातच विजयाचा अर्थ दडलेला आहे. विजय म्हणजे यश, आणि दशमी म्हणजे दहावी तिथी. या दिवशी मिळालेल्या विजयाच्या स्मरणार्थ हा सण साजरा केला जातो. धार्मिक मान्यतेनुसार, प्रभू श्रीरामांनी याच दिवशी रावणाचा वध करून अधर्माचा नाश केला आणि धर्माचा विजय घडवून आणला. तसेच देवी दुर्गेने महिषासुराचा पराभव करून जगाला त्याच्या अत्याचारातून मुक्त केले, अशीही श्रद्धा आहे. या दोन्ही कथा आपल्याला एकच संदेश देतात-वाईट कितीही शक्तिशाली असले, तरी सत्य, धैर्य आणि धर्म यांच्या मार्गाने चालणाऱ्याचा अखेरीस विजय होतो.

प्रभू श्रीराम आणि रावणाच्या वधाची कथा दसऱ्याच्या सणाशी प्रभू श्रीरामांच्या विजयाची कथा अतिशय जवळून जोडलेली आहे. रामायणानुसार, लंकेचा राजा रावण हा अत्यंत विद्वान, पराक्रमी आणि सामर्थ्यवान होता. परंतु त्याच्या अहंकारामुळे आणि चुकीच्या निर्णयांमुळे त्याचा विनाश झाला. रावणाने सीतामातेचे अपहरण केले. त्यानंतर प्रभू श्रीरामांनी सीतामातेच्या सुटकेसाठी लंकेवर स्वारी केली. या युद्धात लक्ष्मण, हनुमान आणि वानरसेनेने श्रीरामांना साथ दिली. अनेक दिवस चाललेल्या युद्धानंतर श्रीरामांनी रावणाचा वध केला आणि सीतामातेला मुक्त केले. या विजयाच्या स्मरणार्थ दसरा साजरा केला जातो. अनेक ठिकाणी रावणाच्या प्रतिमांचे दहन केले जाते. या परंपरेमागील अर्थ केवळ एका व्यक्तीचा पराभव नसून, माणसाच्या मनातील अहंकार, क्रोध, लोभ, मत्सर आणि अन्याय यांसारख्या दुर्गुणांचा नाश करणे हा आहे. रावणाकडे ज्ञान होते, सत्ता होती, संपत्ती होती; परंतु अहंकारामुळे त्याने विवेक गमावला. त्यामुळे दसरा आपल्याला शिकवतो की, कितीही मोठे यश मिळाले तरी माणसाने नम्रता सोडू नये. ज्ञानाबरोबर विवेक, सामर्थ्याबरोबर संयम आणि यशाबरोबर माणुसकी असणे आवश्यक आहे.

समाजात शांतता राखणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, महिलांचा सन्मान करणे, गरिबांना मदत करणे आणि प्रत्येक व्यक्तीशी माणुसकीने वागणे, ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. दसऱ्याचा आनंद साजरा करताना पर्यावरणाची काळजी घेणेही महत्त्वाचे आहे. फटाक्यांचा अतिरेक टाळणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि सण साजरा करताना इतरांना त्रास होणार नाही याची काळजी घेणे, हीसुद्धा जबाबदार नागरिकाची भूमिका आहे. सणाचा खरा आनंद तेव्हाच वाढतो, जेव्हा आपल्या आनंदामुळे इतरांच्याही चेहऱ्यावर हास्य फुलते. या दसऱ्याला करूया एक सुंदर संकल्प! या दसऱ्याच्या पवित्र दिवशी आपण स्वतःला काही प्रश्न विचारूया. आपण आपल्या आई-वडिलांना पुरेसा वेळ देतो का? आपल्या यशाच्या प्रवासात मदत करणाऱ्या लोकांचे आभार मानतो का? दुसऱ्यांच्या भावना समजून घेतो का? आपल्या चुका मान्य करून त्यात सुधारणा करतो का? या प्रश्नांची उत्तरे शोधताना आपल्या जीवनात बदल घडवण्याची संधी मिळते. चला, या दसऱ्याला आपण असा संकल्प करूया की, कोणाचेही मन विनाकारण दुखावणार नाही, शक्य तिथे मदत करू, प्रामाणिकपणे काम करू, नाती जपू आणि प्रत्येक दिवस कालपेक्षा अधिक चांगला बनवण्याचा प्रयत्न करू. दुसऱ्याला हरवण्यापेक्षा स्वतःमधील वाईट सवयींना हरवणे अधिक मोठा विजय आहे. दुसऱ्यापेक्षा मोठे होण्यापेक्षा स्वतःच्या कालच्या रूपापेक्षा चांगले होणे अधिक महत्त्वाचे आहे. यंदाच्या दसऱ्याला रावणाचे दहन करण्याबरोबरच मनातील अहंकाराचेही दहन करूया आणि आपल्या जीवनात सत्य, प्रेम, सद्भावना व माणुसकीचा विजय साजरा करूया.

दसऱ्याच्या दिवशी शस्त्रपूजन, वाहनपूजन, औजारपूजन आणि व्यवसायाशी संबंधित साधनांची पूजा करण्याची परंपरा आहे. पूर्वीच्या काळात योद्धे आपल्या शस्त्रांची पूजा करून विजयासाठी प्रार्थना करत असत. आजही अनेक ठिकाणी या परंपरेचे पालन केले जाते. शेतकरी आपल्या शेतीच्या अवजारांची पूजा करतात. कारागीर आपल्या कामाच्या साधनांना वंदन करतात. व्यावसायिक आपल्या दुकानात आणि कार्यालयात पूजा करतात. अनेकजण आपल्या वाहनांची पूजा करून सुरक्षित प्रवासासाठी प्रार्थना करतात. या परंपरेचा व्यापक अर्थ असा की, आपल्या उपजीविकेची साधने, आपल्या कामातील कौशल्य आणि आपल्याला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणाऱ्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करावी. आपण ज्या साधनांच्या मदतीने मेहनत करतो, कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो आणि समाजासाठी योगदान देतो, त्यांचा आदर करणे आवश्यक आहे. पूजा केल्यानंतर ती साधने जबाबदारीने आणि सुरक्षितपणे वापरणेही तितकेच महत्त्वाचे आहे. दसरा हा नवीन कामाच्या सुरुवातीचा शुभ दिवस दुसऱ्याला हरवण्यापेक्षा स्वतःमधील वाईट सवयींना हरवणे अधिक मोठा विजय आहे. दुसऱ्यापेक्षा मोठे होण्यापेक्षा स्वतःच्या कालच्या रूपापेक्षा चांगले होणे अधिक महत्त्वाचे आहे. यंदाच्या दसऱ्याला रावणाचे दहन करण्याबरोबरच मनातील अहंकाराचेही दहन करूया आणि आपल्या जीवनात सत्य, प्रेम, सद्भावना व माणुसकीचा विजय साजरा करूया.

**दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा!**

# विजयादशमी ;दुष्टप्रवृत्तीचा नाश करून मिळालेला विजय

लंकापती रावन हे महान राजनितिज्ञ,ज्ञानी व पराक्रमी राजा होते म्हणूनच त्यांना लंकापती रावण संबोधले जायचे.परंतु त्यांच्यात काही दृष्ट, अहंकारी व वाईट प्रवृत्ती होत्या.त्यांनी माता सीतेचे हरण करून राक्षसीप्रवृतीचा आगास केला. हा त्यांचा सर्वात मोठा गुन्हा होता आणि यातुनच लंकापती रावण व राक्षस कुळाचा परास्त होण्याला सुरूवात झाली.यानंतर रावणाने पुर्णपणे अधर्माचा मार्ग पत्करला अधर्माचा मार्ग सोडण्यासाठी देवी-देवता,आप्त-नातेवाईक,राजनैतिज्ञ गुरूसह अनेकांनी प्रयत्न केले. परंतु रावणाच्या अहंकारापुढे संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले व सीतेला हस्तगत करण्याच्या जीद्दीने रावणाने आपल्याच संपूर्ण कुळाला युध्दाच्या खाईत लोटले व लंकापती रावण यांच्या सर्वनाशाची आकाशवाणी झाली. हळूहळू संपूर्ण मोठ-मोठे बलाढ्य शुरविर धाराशाही झाले.यात मुख्यत्वेकरून मेघनाथ,कुंभकर्णासारखे महाबलशाली यांनाही रावणाने मृत्यूच्या खाईत लोटले.त्याच प्रवृत्तीचा नाश करण्यासाठीच प्रभुश्रीरामचंद्र हे पृथ्वीतलावर अवतरले व रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा रामानी वध केला. विजयादशमी म्हणजे असत्याचारावर सत्याचा विजय,अशुध्दतेवर शुध्दतेचा विजय, अंधारावर प्रकाशाचा विजय,अमानुषतेवर मानवतेचा विजय, निसर्गाचा होत असलेला ह्रास टिकवुन ठेवण्यासाठी वृक्षलागवड करणे हाही विजयच, म्हणजेच आत्म्यातील रावणाचे दहण करुन रामाने सांगितलेला सत्याचा मार्ग अवलंबने हाच खरा सण विजयादशमी होय. राम हे आदर्शपुरुष त्यामुळेच भारताने नेहमी आदर्शाचीच भुमिका जोपासली आहे.तेव्हाच भारतात सर्व धर्म समभाव दिसून येतो. त्याचप्रमाणे भारतीय संस्कृतित सर्वात महत्वाचा आणि शुभ दिवस म्हणजे विजयादशमी साडेतिन मुहुर्तापैकी एक असे या दिवसाला व सणाला आगळेवेगळे महत्व आहे. घटस्थापनेपासुन तर दसऱ्यापर्यत संपूर्ण भारतात उत्सहाचे, आनंदाचे व मांगल्याचे वातावरण आपल्याला पहायला मिळते व याच दिवसापासुन दिवाळीचा शंखनाद संपूर्ण भारतात गुंजतो. नवरात्र उत्सवामध्ये देवीची ९ दिवस आराधना करून नवरात्र उत्सव साजरा केला जातो व दशमीला म्हणजेच विजयादशमीला दसरा उत्सव मोठ्या थाटात भारतभर साजता केला जातो. हा दीवस म्हणजे असुरीशक्तीचा नाश व सत्याचा विजय मानले जाते. दशमीला प्रभुरामचंद्राने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा संहार करुण असुरीशक्तीला संपवुन मानवतेचे रक्षण केले. त्या निमित्यानेच विजयादशमी उत्सव साजरा केला जातो. याच दीवशी मॉ जगदंबेने अनेक राक्षसाचा वध करुण विजय प्राप्त केला. त्याचप्रमाणे पांडव अज्ञातवासात असतांना पांडवांनी शम्मीच्या झाडावर लपविलेली शस्त्रे याच दीवशी काढण्यात आली व याच दीवशी रामाने रावणाच्या वाईट प्रवृत्तीचा वध करुन विजय प्राप्त केल्याच्या अनेक कथांमध्ये व पुराणांमध्ये आपल्याला पहायला मिळते. त्याच अनुशंगाने विजयादशमीला सोण्याच्या(आपट्याच्या)पाणाला तीतकेच अतुट महत्व आहे. सोण्याचे पान एकमेकांना देवुन आनंदोत्सव साजरा करतात व लहान-मोठ्यांना शुभेच्छा व आर्शिवाद देतात. त्याचप्रमाणे



दसऱ्याच्या दिवशी सर्वसामान्य व शेतकरी आपल्या उपयोगात येणाऱ्या संपूर्ण शस्त्रांची (साहित्याची)पुजा करतांना फुलांसोबत सोण्याचे पाणांनी पुजा अर्चना केली जाते. यावरुन आपण समजु शकतो कि, सोण्याच्या पाणाला विजयादशमीच्या दिवशी कीती आगळेवेगळे महत्व आहे. देशात वाढते प्रदुषण, बदलते हवामान व अलनिनोचा प्रभाव पहाता विजयादशमीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवडीकडे लक्ष देण्याची नितांत गरज आहे.कारण प्रत्येक झाडात,फुलात,फळात, मुळात देवीदेवतांचा वास असतोच.त्यामुळे वृक्षलागवडीने देवीदेवतांचे दर्शन अवश्य होईल सोबतच सर्वांना शुध्द हवा, ऑक्सिजन मिळेल व संपूर्ण जीव-जंतुंमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होईल.सोबतच गुरांना चारा व सर्वांना सावलीचा आनंद घेता येईल.अशाप्रकारे सर्वत्र उत्साहाचे आणि मांगल्याचे वातावरण वृक्षलागवडीमुळे दिसून येईल. दसऱ्याच्या हार्दिक शुभेच्छा! जय हिंद.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर**

# पावसाची लपाछपी, कोकण चिंतेत!

पावसाच्या या शिडकाव्याने कोकणातील शेतकरी काहीसा सुखावला, म्हणजे भाताची 'जीव जगवणी' झाली असं त्याला वाटू लागलं. आणि परत पाऊस गायब झाल्याने विहिरीच्या, नदीच्या पाण्याने शेती शिंपून भाताची रोपे जिवंत ठेवण्याचा प्रयत्न काही शेतकरी करत आहेत. गेले दोन दिवस पाऊस थोडावेळ हजेरी लावतो तर अनेक भागांमध्ये कडक उन्हामुळे शेतामध्ये भेगा पडल्या आहेत. परंतु पावसाच्या थोड्यावेळाच्या हजेरीने या शेतजमिनीला पडलेल्या भेगाही भरून निघतील, पण पाऊस पडायला हवा. कोकणातील शेतकरी पावसाच्या प्रतिक्षेत असून कोकणात पावसाचा लपाछपीचा खेळ सुरू आहे.

महाराष्ट्रात पूर्वी कोकण प्रांत भात पिकात अग्रेसर होता. शालेय पाठ्यपुस्तकात भुगोल शिकताना त्यामध्ये कोकणातील पिकांमध्ये भात अग्रस्थानी असल्याचे सांगितले जायचे. कोकणच्या जनतेच्या खाद्य पदार्थांमध्ये भात आणि मासे हे प्रमुख अन्न म्हटले जायचे. कोकणातील रायगड जिल्हा हा सर्वाधिक भात पिकवणारा जिल्हा म्हणून ओळखला जायचा. रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात भात, नाचणी पिके घेतली जात. गेल्याकाही वर्षांमध्ये शेतीचं स्वरूप बदलले. कोकणातील अनेक कुटुंब नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने कोकण बाहेर नागपूर, नाशिक, पुणे, मुंबई या शहरीभागात वास्तव्याला गेले. कोकणात कायमस्वरूपी रहाणाऱ्यांची संख्या फारच कमी झाली. यामुळे साहजिकच कोकणातील शेतीवर परिणाम झाला. भातशेती करायची तर किमान कुटुंबांतील चार-सहा शेतात काम करणारी माणसं हवीत. शेतात राबणारे हातच कमी झाले. नोकरी-व्यवसायात तरूण शहरांमध्ये गेले आणि थरथरत्या हातांची समाधानी मनाची वृद्ध माणसं गावात आहेत. परंतु त्यांची



शेतात काम करण्याची क्रयशक्तीच उरलेली नाही. परिणामी कोकणातील भातशेतीचे क्षेत्र कमी झाले. अर्थात काहींनी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत शेती करण्याचा प्रयत्न केला. परंतु पूर्वीप्रमाणे पारंपरिक पद्धतीची शेतीची अवजारे आता दुर्मिळ होत चालली आहेत. जून महिन्याच्या ७ तारखेला मृग नक्षत्राच्या मूहर्तावर पावसाचे आगमन होत असे. सुरूवातीच्या काही दिवसांतच पाऊस असा काही बरसायचा की आता पाऊस थांबावा असं शेतकरी म्हणायचा. कोकणातील नदी-नाले, ओहोळ दुथडी भरून वाहायचे. मे महिन्याच्या रणरणता उन्हाळा संपून येणाऱ्या पहिल्या पावसात कोकण हिरवंगार होऊन जायचं. आंबा, काजू, रतांबा आदी फळ पिकांची जोडणी करणारा शेतकरी भात पेरणीसाठी सज्ज असायचा. पावसाचं आगमन कोकणातील शेतकऱ्याला खुणवायचं, भातशेती करणारा शेतकरी किमान वर्षभर कुटुंबाला भात पूरेल अशा पद्धतीने नियोजन करायचा. भात आणि माशांचं कालवण (आमटी) हे प्रमुख अन्न पदार्थ असल्याने भात भरपूर पिकलं की कोकणातील घराघरांत आनंदी वातावरण असायचे. पैशाची श्रीमंती फार नव्हती. कोकणातील शेतकऱ्याच्या गाठीला अधिकचा पैसा नव्हता. जेमतेम मुलांचं शिक्षण दोन वेळचं जेवण मिळतंय याचा कोण आनंद कोकणातील शेतकऱ्याच्या मनात असायचा.

घरात वर्षभर खाऊनही भाताची कणगी, मुडी बांधलेली असायची. आता घरात कणगी भरलेलं भात आणि तसा शेतकरी शोधावा लागेल. भाताचा संचय करणारा शेतकरीही आता नाही. असलाच तर रायगड जिल्ह्यातील काही भागात असे शेतकरी असू शकतात. परंतु दक्षिण कोकणात मात्र आता भातशेतीचे क्षेत्र फारच कमी झाले आहे. काही कुटुंबात निष्ठेने, आवड म्हणून आणि कुटुंबाची कोकणची परंपरा म्हणून शेती केली जाते. अशा कुटुंब संस्था आजही एकत्र कुटुंबांचे दर्शन घडवत शेतात राबताना, आनंद घेताना दिसतात. सध्या ऋतुचक्रातील अनियमितता या शेतीच्या आड येऊ लागली आहे. यावर्षी जूनचा पहिला पंधरवडा देखील सुकाच गेला. अखेरीस पाऊस पडला तर पेरणी करावयाची की नाही अशा द्विधा मन:स्थितीत असताना थोडाफार पाऊस पडला त्याचा आधार घेत कोकणातील शेतकऱ्यांनी पेरणी केली. परंतु काही दिवस पावसाने दडी मारल्याने भात पेरणी होऊन देखील भात चांगले उगवेल की नाही याची खात्री उरली नाही. यातच एप्रिल-मे महिन्यात जसा रणरणता उन्हाळा असतो त्यापेक्षाही अधिक उन्हाळा कोकणात जाणवू लागला होता. आता कुठे दोन तीन दिवस पडलेल्या पावसाच्या शिडकाव्याने कोकणातील शेतकरी काहीसा सुखावला, म्हणजे भाताची 'जीव जगवणी' झाली असं त्याला वाटू लागलं. अनेक भागांमध्ये कडक उन्हामुळे शेतामध्ये भेगा पडल्या आहेत. परंतु पावसाच्या थोड्या वेळाच्या हजेरीने या शेतजमिनीला पडलेल्या भेगाही जातील. कोकणातील शेतकरी संततधार पावसाच्या प्रतिक्षेत आहे. सध्या कोकणात पावसाचा लपाछपीचा खेळ सुरू आहे. अशावेळी पूर्वी 'ऊन आणि पाऊस कोल्याचा लगीन' हे गंमतीच आवर्जून म्हटलं जायचं पण आता हे वाक्य उच्चारण्याची हिम्मतही कोकणातील शेतकऱ्यांमध्ये उरलेली नाही. वारंवार गायब होणारा पाऊस बरसावा याच प्रतिक्षेत कोकणातील शेतकरी आहे.

# मुद्द्यांमध्ये रस नाही.

कोणालाही अभिजीत दीपके यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांमध्ये रस नाही. केवळ भाजपच्या विरोधात आंदोलन करून मिळाले तर त्या आंदोलनाचा उपयोग करून घ्यायचा आहे, हे त्यांचे षडयंत्र स्पष्ट दिसते. अन्यथा उद्धव ठाकरे यांनी या आंदोलनाला पाठिंबा दिला नसता. विरोधी पक्ष, मग ती शिवसेना उबाठा असो किंवा तृणमूल काँग्रेस असो. या अधिवेशनाच्या अगोदर फुटीमुळे खिळखिळे झाले आहेत. स्वतः च्या चुकीमुळे पक्षाचे पानिपत झाले, पण आता सीजेपीच्या तुटक्या आधाराने स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. आंदोलनात आता योगेंद्र यादव हेही सामील झाले आहेत. ते तर जिथे जातील तेथे वाटोळेच करतात. तेच या आंदोलनाचे होणार आहे. सोनम वांगचुक यांच्याविषयी बोलायचे तर अशी चर्चा आहे की, त्यांच्याबद्दल पसरलेली माहिती ही तद्दन बनावट आहे. २००९ पासून आमिर खान याचा थ्री इडियट्स हा चित्रपट आला आणि तेव्हापासून देशात असे भासवण्यात आले की त्यातील आमिर खानची वांगडूची भूमिका ही सोनम वांगचुक यांच्या खऱ्या आयुष्यावर आधारित आहे. पण दोन दिवसांपूर्वी आमिर खानने हे स्पष्ट केले आहे की, चित्रपट जेव्हा रिलीज झाला, तेव्हा आपण वांगचुक यांना ओळखतही नव्हतो. वांगचुक यांचा खोटेपणा उघड झाला आहे. अर्थात वांगचुक यांनी प्रशंसनीय काम केले आहे आणि त्यांनी शिक्षणाच्या संदर्भात जे काही कार्य केले आहे, ते चांगलेच आहे. त्याबद्दल कुणीही त्यांची प्रशंसाच करतील. पण वांगचुक यांच्या आंदोलनाचा गैरफायदा घेऊन विरोधक भाजपला घेरण्याचा जो प्रयत्न करत आहेत तो अश्लाघ्य आहे. यंदाचे संसदेचे अधिवेशन महत्त्वाचे आहे. सरकार आठ विधेयके मांडणार आहेत व एनडीए लोकसभेत दोन तृतीयांश बहुमताच्या जवळपास पोहोचले आहे. ही बाब विरोधकांना सहन होत नाही आणि त्यामुळे त्यांची आंदोलनाच्या निमित्ताने सरकारला घेरण्याची रणनीती आहे. तृणमूल काँग्रेसच्या वीस खासदारांना लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी स्वतंत्र आसन व्यवस्था मंजूर केली आहे आणि येथेच विरोधकांचा पोटशूळ उठला आहे. या सदस्यांच्या एनडीएतील प्रवेशामुळे त्यांची लोकसभेतील सदस्य संख्या आता ३६० झाली आहे. या आधी शाहीन बाग आणि आता जंतरमंतर हे स्थान अशा आंदोलनजीवींचे स्थान झाले आहे. वांगचुक यांनी सरकारपुढे तीन अटी ठेवल्या आहेत आणि त्या मान्य केल्या पाहिजेत, अशी त्यांची मागणी आहे. किसान आंदोलनाचे टिकैत हेही या आंदोलनात सहभागी होत आहेत, तर सपाचे कार्यकर्ते आंदोलनात सहभागी आहेत. नेपाळमध्ये जेन झी आंदोलन झाले होते. त्याची पुनरावृत्ती विरोधी पक्षांना भारतात घडवायची आहे, हे स्पष्ट दिसते. हे खरे तर सरकारच्या विरोधात रचलेले षडयंत्र असल्याचे स्पष्ट दिसते. पण असे म्हणण्याला काही आधार नाही. पण जी वस्तुस्थिती दिसते, ती तर याकडे निर्देश करते की सारे काही आलबेल नाही. अर्थात कॉकरोच जनता पार्टी सरकारशी चर्चा करण्यास तयार आहे आणि तीन विद्यार्थ्यांनी आपले उपोषण मागेही घेतले आहे. पण विरोधी पक्षांना सामोपचाराने तयार झालेले वातावरण नको असावे, अशी शंका येते. दिल्लीत वातावरण सरकारविरोधी आहे, ही बाब सत्य आहे. पण सरकार आता बेरोजगारीच्या मुद्द्यावर वाटाघाटींना तयार झाले आहे. त्यामुळे तीन विद्यार्थ्यांनी उपोषण मागे घेतले. हे निश्चितच सकारात्मक संकेत आहेत. सोनम वांगचुक यांची प्रकृती उत्तम असल्याचे संकेत आहेत. ते उद्या मोर्चात सहभागी होणार आहेत. या देशात आंदोलनाला कुणीच मनाई केलेली नाही. लोकशाही मार्गाने जोपर्यंत आंदोलन चालू आहे, तोपर्यंत त्यांला परवानगीच आहे. जे. पी. नड्डा हे आंदोलकांशी वाटाघाटी करण्यास तयार झाले आहेत. कॉकरोच जनता पार्टीने सरकारशी वाटाघाटी कराव्यात. पण त्यांना हव्या त्या मागण्या पदरी पाडून घेण्यास ते स्वतंत्र नाहीत, हेही त्यांनी लक्षात घेतले पाहिजे. वांगचुक यांनी पूर्वी उपस्थित केलेल्या शिक्षणासंदर्भातील मुद्द्यावर जनतेची ही तशीच भूमिका आहे. अभिजीत दीपके यांची शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा द्यावा ही मागणी सरकार मान्य करणे अशक्य आहे. धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याची काही आवश्यकता नाही. कारण गुन्हेगारांवर कारवाई करण्यात आली आहे, असे रामदास आठवले यांनी सांगितले. त्यामुळे पुन्हा तीच मागणी रेटून धरण्यात केवळ आपले वर्चस्व दाखवण्याचा प्रयत्न आहे हे कळते. आता तर दीपके यांनी आपले आंदोलन मागे घेत नड्डा यांच्याशी वाटाघाटीची तयारी दाखविल्याने आंदोलनाची हवा निघून गेली आहे. अण्णा हजारे यांनी असेच आंदोलन केले होते आणि त्याच्या जोरावर अरविंद केजरीवाल हे दिल्लीचे मुख्यमंत्री झाले. त्यानंतर त्यांची सत्ता गेली, ही बाब निराळी. उपोषण सर्वात आधी महात्मा गांधी यांनी सुरू केले होते. पण त्यांचे उपोषण हे कोणत्या वैयक्तिक लाभासाठी नव्हते. पण आताचे आंदोलनजीवी आहेत, त्यांना त्यांचा स्वार्थ अशी आंदोलने करण्यासाठी भाग पाडतो. दीपके कदाचित उद्या मोर्चात सहभागी होतील. पण अण्णांचे आंदोलन आणि आंदोलनजीवींचे आंदोलन यात काहीही गुणात्मक फरक नाही हे सिद्ध झाले. असे म्हणून त्यांच्या आंदोलनाच्या हेतूविषयी काहीही अधिक्षेप करण्याचा हेतू नाही. पण आंदोलनाचा उपयोग समाजाच्या उत्थानासाठी व्हायला हवा. हा हेतू कुठेतरी भटकला आहे असे दिसते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO.MHMAR/26/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**

# विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबरला मतदान, १८२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात

मुंबई: सध्या महाराष्ट्रामध्ये विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदानाची जोरदार चर्चा सुरू आहे. या निवडणुकीमुळे संपूर्ण राज्याचं राजकारण ढवळून निघालं आहे. ही, महाराष्ट्र विधान परिषदेची अटीतटीची आणि बहुचर्चित औरंगाबाद, पुणे आणि नागपूर विभागातील तीन पदवीधर सोबतच अमरावती आणि पुणे विभागातील दोन शिक्षक मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणुकीसाठी शुक्रवारी, २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदार संघाच्या निवडणूकीसाठीची मतदान प्रक्रिया सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत पार पडणार आहे. पाच मतदार संघामध्ये होणाऱ्या ह्या निवडणूकीमध्ये एकूण १८२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात उभे आहेत. या निवडणुकीसाठी पाचही मतदारसंघांत २ हजार ४१९ मतदान केंद्रांची व्यवस्था करण्यात आली असून, १० लाख ६८ हजार ७२ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. विधान परिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदार संघासाठीची निवडणूक प्रक्रिया निष्पक्ष, पारदर्शक आणि निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची निवडणूक यंत्रणा सज्ज झाली आहे. पुणे (शिक्षक आणि पदवीधर), नागपूर, अमरावती आणि औरंगाबाद या पाचही मतदारसंघांतील विद्यमान सदस्यांची मुदत ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येत असल्यामुळेभारत निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार ही निवडणूक घेण्यात येत आहे.

**CHANGE IN NAME**

**दै.चकमक**

I HAVE CHANGED MAY NAME
FROM
OLD NAME MOHAN JIVANE KOKNE
TO NEW NAME
MOHAN JIVAN KOKANE
Address:Nathangar Post Gunj bk
Tq:Ghansawangi District :Jalna Pin
cod:431211 Maharashtra
Affidavit No 77AB 755631

२३ ऑक्टोबरला निवडणूक झाल्यानंतर मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी केली जाणार आहे. संपूर्ण निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. पाच जागांसाठी १८२ उमेदवार रिंगणात औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून ४१, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून ४७ आणि नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून ३८ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. तर, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून २६ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून ३० उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक उमेदवार असून, या पाचही मतदारसंघांत मिळून १८२ उमेदवारांचे राजकीय भवितव्य मतदार ठरविणार आहेत.

२ हजार ४१९ मतदान केंद्रांवर व्यवस्था

पाचही मतदारसंघांमध्ये एकूण १० लाख ६८ हजार ७२ मतदारांची नोंद आहे. यामध्ये पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात सर्वाधिक ३ लाख ८८ हजार १९ मतदार, तर अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात सर्वात कमी ३५ हजार ८१० मतदार आहेत.

मतदानासाठी औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघात ८४२, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघात ७४१, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघात ४४५, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघात ८१ आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघात ३१० मतदान केंद्रे उभारण्यात आली आहेत. सर्व मतदारसंघांतील मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात आले आहे.

६ डिसेंबरला विद्यमान सदस्यांची मुदत संपणार

विधान परिषदेच्या ज्या पाच जागांसाठी ही निवडणूक होत आहे, त्या जागांवरील विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी पूर्ण होत आहे. यामध्ये औरंगाबाद पदवीधर मतदारसंघाचे सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे पदवीधर मतदारसंघाचे अरुण गणपती लाड, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती शिक्षक मतदारसंघाचे किरण रामराव सरनाईक आणि पुणे शिक्षक मतदारसंघाचे जयंत दिनकर आसगावकर यांचा समावेश आहे.

पान १ वरुन

## परतूरात आज भव्य

उत्साहाने उपस्थिती लावतात. या कार्यक्रमास माँ बागेश्वरी साखर कारखान्याचे चेअरमन शिवाजीराव जाधव, राहुल लोणीकर, नितीन जेथलिया, शिवसेना जिल्हाप्रमुख महेश नळगे, राष्ट्रवादी काँग्रेसचे कपिल आकात, माजी नगराध्यक्ष मोहन अग्रवाल आकाश राक्षे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे, पोलीस निरीक्षक कलमदाने तसेच प्रशासकीय अधिकाऱ्यांसह सर्वपक्षीय आजी माजी पदाधिकारी, नगरसेवक व्यापारी, पत्रकार व प्रतिष्ठित नागरिक उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात शहर व परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने वाजत-गाजत सहभागी व्हावे, असे आवाहन उत्सव समितीच्या वतीने करण्यात आले आहे. दसरा उत्सवाच्या या पारंपारिक सोहळ्यामुळे परतूर शहरात उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

पान १ वरुन

## पोलीसांची मोठी कारवाई...

उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली कदीम जालना पोलिसांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. गावठी पिस्तूल अन् तीन जिवंत काडतुसे जप्त

पोलिसांनी संशयिताची झडती घेतली असता त्याच्याकडे गावठी बनावटीचे पिस्तूल आणि तीन जिवंत काडतुसे आढळून आली. तसेच पिस्तूल तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या साहित्याशी संबंधित वस्तूही जप्त करण्यात आल्या. या कारवाईत एकूण ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आल्याचे पोलिसांनी प्रसिद्धिपत्रकात नमूद केले आहे. या प्रकरणी गौरव ऊर्फ गणेश योगराज मांडोळे (वय २६, रा. खंडोबानगर, अंबड चौफुली, जालना) याच्याविरुद्ध कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. त्याच्याविरुद्ध शस्त्र अधिनियमाच्या संबंधित कलमान्वये कारवाई करण्यात आली आहे. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पथकाची कामगिरी

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कदीम जालना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जनार्दन शेळके यांच्यासह पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी या कारवाईत सहभाग घेतला. जालना शहरात अवैध शस्त्रे बाळगणाऱ्यांविरुद्ध पोलिसांनी कारवाई तीव्र केली असून, संशयास्पद हालचाली आढळल्यास नागरिकांनी पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

### दशहरा ..

श्रेष्ठ नर कनिष्ठनारी
भेदाभेद आम्हीकरी
पुजनीय लक्ष्मी हरी
दोघांची पुजा करी

नवरात्री देवी सेवा
सुखोत्सव घरो घरी
खेळे गरबा दांडिया
घाली साद परोपरी

अबला माने महिला
मन नीत अत्याचारी
शक्तीमागतो देवीला
हात जोडते लाचारी

नवरात्री या जागुनि
रावण जाळी बाहेरी
विसरे शिल्लक एक
राक्षस राही अंतरी

दसरा करू हसरा
भेद जाळू यंदा तरी
राम सिता वंदे दोन्ही
पुज्य दोघे लक्ष्मीहरि

मन व्हावे चोख सोने
मिळे नाविन्य उभारी
साडे तीन मुहूर्तातला
क्षण ठरेल हाच भारी

भेदाभेदा सिमोलंघन
परिस स्पर्श मनाकरी
कुविचार रावणदहन
सण सार्थ खरोखरी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### सण साजरा..

मना मधला कचरा
सारा निचरा करून
नव्या युगाचा दसरा
नवा प्रयोग म्हणून

अंतरीमातले रावण
दुर्गुण भरिले ठासून
पुण्य कर्मे रे जाळून
सद्गुण घ्याउजळून

विचारे सीमोल्लंघन
वैरभाव पार तोडून
षड्रिपू भाव त्यागून
नाते भक्तमजोडून

आचारचोख सोनेरी
सत्संगा ठेवी सांधून
उन्मांदक विकारांस
जागीच ठेवी बांधून

रे जिव्हा शस्त्रांसम
वापरावी सावरून
सार्थक अस्त्रपुजन
क्रोध लोभआवरुन

प्रभु रामाची मुरत
हृदयांत जपू पुजून
मनी वसे रामराज्य
पाहिजे कायअजून

अंतरात्मा आरशात
स्वता पहा निरखून
आमुलाग्रसद् बदल
कसोटीवर पारखून

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### महिला ..

सावित्रीरमा जिजाई
नारी अत्युच्च स्थानी
बा अहिल्या चेन्नमा
इतिहास ठसवे मनी

राहीलतासिंधुआशा
किती नावे ये ध्यानी
आशा फातिमा मिरा
मदर तेरेसा गं ग्यानी

हिमाउषा मेरी स्मृती
गिता क्रीडारणांगणी
कल्पनाअंतराळामधे
गुजगोष्ट गं तारांगणी

मुर्मु प्रतिभा राष्ट्रपती
निर्मला अर्थआखणी
इंदिरा सुषमा प्रतिभा
कैकनारीराजकारणी

स्मृती मंधाना अव्वल
गाजते क्रिकेटअंगणी
कितीनावे घ्यावयाची
बहुगुणी नारी नोंदणी

जना मुक्ता बहिणाई
समृध्द सुधा लेखणी
गौरीशांताशशीशोभा
कारकीर्द करे देखणी

सर्व क्षेत्री अग्रस्थानी
नारी कुठे नाही उणी
मुलगी ज्याच्या वंशा
तो भगवंताचा ऋणी

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

### कन्या दर ..

आकडे वारी गंभीर
मुलीजन्मदर घटला
उघड आहे कारणे
बिंजाकूरास छाटला

मुलींना सन्मान हवा
विचार मनांस पटला
हाकारा अंतर्मनाला
रे प्रयत्नकधी झटला

पुरुषनारीतले श्रेष्ठत्व
वाद तात्पुरते मिटला
बाजूघेताना स्त्रियांची
आवाज जाई म्युटला

गरजसबलीकरणांची
ऐंन क्षणी मागे हटला
समानतेचाआविर्भाव
फुलण्याआधीखुंटला

प्रश्न करावा स्वताला
कधी स्वतांस भेटला
जबाबदार दुस-यावर
प्रवाह जातोयं रेटला

भरारी फक्त नाममात्र
पतंग ऐनवेळी कटला
मुलींना अधिकारदेता
स्पीड ब्रेकरचं थटला

गांभिर्य हवे सर्वथरांस
अंधार गडदते दाटला
तेंव्हाचकाही सुधारेल
कन्या जन्मदर घटला

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

पान ४ वरुन

### जिल्ह्यात २२ ऑक्टोबरपासून खत

उपलब्ध आहे, ते Farmer ID चा वापर करून प्रणालीमध्ये लॉगिन करू शकतील. यासाठी नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणाऱ्या जढझ द्वारे पडताळणी केली जाईल. त्यानंतर संबंधित शेतकऱ्याच्या जमिनीची माहिती प्रणालीमध्ये उपलब्ध होऊ शकते. ज्या शेतकऱ्यांकडे Farmer ID उपलब्ध नाही, त्यांना आधार क्रमांकाच्या आधारे अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध असेल. यासाठी आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक आवश्यक राहणार आहे. शेतकऱ्यांनी सर्वप्रथम आपली वैयक्तिक माहिती, जमिनीचे क्षेत्रफळ आणि पिकांची माहिती योग्य प्रकारे नोंदविणे आवश्यक आहे. पिकांच्या क्षेत्रानुसार मिळणार खताची शिफारस नोंदणी आणि माहितीची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीचे क्षेत्रफळ, पिकांचा प्रकार आणि इतर संबंधित माहितीच्या आधारे खतांची शिफारस उपलब्ध होणार आहे. यासाठी ॲपमध्ये 'ऋशपशीरश्र ऋशीींळश्रळशी ठशलेााशपवरींळेप' (GFR) ही सुविधा देण्यात आली आहे.
या शिफारशीनुसार शेतकऱ्यांना आवश्यक खताचा प्रकार आणि त्याचे प्रमाण निश्चित करण्यास मदत होईल. त्यामुळे पिकांच्या गरजेनुसार खतांचा वापर करणे शक्य होणार असून, अनावश्यक खत खरेदी आणि अतिवापर टाळण्यास मदत होईल.

**निवडलेल्या खत विक्रेत्याकडून मिळणार QR कोड किंवा टोकन नंबर**

FFS प्रणालीमध्ये शेतकऱ्यांना उपलब्ध पर्यायांमधून खत विक्रेता (Retailer) {नवडता येणार आहे. निवडलेल्या विक्रेत्याकडे आवश्यक खत उपलब्ध असल्यास शेतकऱ्यांना खरेदीची प्रक्रिया पूर्ण करता येईल. खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना संबंधित विक्रेत्याच्या दुकानात जाऊन ॲपमधील ठठ कोड दाखवावा लागेल किंवा प्रणालीतून प्राप्त झालेला टोकन नंबर द्यावा लागेल. त्यानंतर विक्रेता आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून शेतकऱ्याला खत उपलब्ध करून देईल. त्यामुळे खत खरेदीची नोंद डिजिटल पद्धतीने होणार असून, विक्री प्रक्रियेत पारदर्शकता वाढण्यास मदत होईल.
खत खरेदीसाठी तीन दिवसांची मुदत खत बुकिंग केल्यानंतर ठठ कोड किंवा टोकन नंबर प्राप्त झाल्यापासून तीन दिवसांच्या आत संबंधित शेतकऱ्याने रासायनिक खतांची खरेदी करणे आवश्यक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी बुकिंग केल्यानंतर निर्धारित मुदतीत निवडलेल्या विक्रेत्याकडून खत खरेदी करावे.
शेतकऱ्यांनी कोणती काळजी घ्यावी?

FFS **प्रणालीचा वापर करताना शेतकऱ्यांनी पुढील बाबींची काळजी घ्यावी** :

मोबाईलमध्ये "Framework for Fertilizer Sale' हे ॲप डाउनलोड करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी.
Farmer ID उपलब्ध असल्यास त्याचा वापर करावा. Farmer ID नसल्यास आधार क्रमांकाच्या आधारे अर्ज करावा.आधारशी जोडलेला मोबाईल क्रमांक कार्यरत असल्याची खात्री करावी, जेणेकरून OTP पडताळणी करता येईल.
जमिनीचे क्षेत्रफळ, गाव, पिकांचा प्रकार आणि इतर माहिती अचूक भरावी.
ॲपमध्ये उपलब्ध GFR शिफारशीनुसार आवश्यक खताचा प्रकार आणि प्रमाण निवडावे.
खत विक्रेता निवडल्यानंतर प्राप्त झालेला ठठ कोड किंवा टोकन नंबर जतन करून ठेवावा.
खत खरेदीसाठी प्रतिनिधी पाठवायचा असल्यास त्याच्या आधार क्रमांकाची व मोबाईल क्रमांकाची आवश्यक माहिती तयार ठेवावी.
QR कोड किंवा टोकन नंबर मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत खत खरेदी करावी.

**ॲप कुठे मिळणार?**

"Framework for Fertilizer Sale' हे ॲप केंद्र शासनाच्या कृषी विभागाच्या माध्यमातून उपलब्ध करून देण्यात आले आहे. शेतकरी हे ॲप Google Play Store वरून डाउनलोड करू शकतात. ॲपची लिंक पुढीलप्रमाणे आहे :
https://play.google.com/store/apps/details?id=com.agristack.fsas
जालना जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांनी ऋऋड प्रणालीचा जास्तीत जास्त वापर करून खत खरेदीची प्रक्रिया सुलभ आणि नियोजनबद्ध करावी, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. जिल्ह्यातील तालुका कृषी अधिकारी, मंडळ कृषी अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, खत विक्रेते तसेच गुणनियंत्रण निरीक्षकांनी शेतकऱ्यांमध्ये या प्रणालीबाबत जनजागृती करावी आणि आवश्यक मार्गदर्शन करावे, अशा सूचनाही देण्यात आल्या आहेत. या उपक्रमामुळे खत विक्री प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणे, खतांच्या वितरणात पारदर्शकता वाढविणे आणि शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांच्या गरजेनुसार खत खरेदी करण्यास मदत होणे अपेक्षित आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी नव्या प्रणालीची माहिती घेऊन २२ ऑक्टोबरपासून खत खरेदी करताना ऋऋड प्रणालीचा वापर करावा, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने केले आहे.

**तालुकास्तरीय मदतीसाठी संपर्क** : जालना, बदनापूर, भोकरदन, जाफराबाद, मंठा, परतूर, घनसावंगी आणि अंबड या तालुक्यांसाठी प्रसिद्धीपत्रकात कृषी अधिकारी कार्यालयांतील गुणनियंत्रण निरीक्षक तसेच पंचायत समिती कार्यालयांतील संबंधित अधिकाऱ्यांचे संपर्क तपशील देण्यात आले आहेत. शेतकऱ्यांनी आपल्या तालुक्यातील संबंधित कार्यालयाशी संपर्क साधून FFS प्रणालीबाबत मार्गदर्शन घ्यावे.

जालना शहरातील श्री

मंडळाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे धार्मिक उत्सवाबरोबरच सामाजिक एकोपा आणि जनसेवेची परंपराही मंडळाने जपली आहे.

मागील २१ वर्षांपासून नवरात्रोत्सव साजरा करताना मंडळाने शिस्त आणि सामाजिक सलोख्याला प्राधान्य दिले आहे. या कालावधीत परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडलेला नसल्याचे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. उत्सव शांततेत आणि उत्साहात पार पडावा, यासाठी पोलीस प्रशासनाला मंडळाच्या वतीने संपूर्ण सहकार्य केले जाते. धार्मिक उत्सव साजरा करतानाच सामाजिक उपक्रमांतून समाजाशी असलेली बांधिलकी जपण्याचा मंडळाचा प्रयत्न असल्याचेही यावेळी स्पष्ट करण्यात आले.

इंदेवाडी येथील भू

बॅगची तपासणी केली. या तपासणीत बॅगमध्ये बॉम्बसदृश वस्तू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर अंमलदार सुनील निळवंत यांनी आवश्यक उपकरणांच्या मदतीने संबंधित बॅग सुरक्षित ठिकाणी हलवली. पुढील कार्यवाहीदरम्यान अंमलदार रोहिदास देशमाने यांनी संशयास्पद बॅगमधील बॉम्बसदृश वस्तू बाहेर काढून मॅगझिनमध्ये ठेवली. त्यानंतर ही वस्तू वाहनाद्वारे एसडीए (डऊ-) परिसरात नेण्यात आली. विविध पथकांच्या उपस्थितीत प्रात्यक्षिक

पान ४ वरुन

या मॉक ड्रिलमध्ये बीडीडीएस पथकातील GPSI पाटील, हेड कॉन्स्टेबल शेवाळे, पोलीस कॉन्स्टेबल पैठणे, खरात तसेच श्वान स्विटी यांनी सहकार्य केले. यावेळी भू-अनुश्रवण केंद्रातील अधिकारी व अंमलदार, तालुका जालना पोलीस ठाण्याचे एपीआय चव्हाण, आरसीपी-२ चे हेड कॉन्स्टेबल चरावंडे तसेच इतर अंमलदार आणि पोलीस कॉन्स्टेबल खिजर उपस्थित होते. या मॉक ड्रिलच्या माध्यमातून संशयास्पद वस्तू आढळल्यास तातडीने प्रतिसाद देणे, श्वान पथक व आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने तपासणी करणे आणि संबंधित वस्तू सुरक्षितपणे हाताळण्याच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करण्यात आले.

### शासकीय वसतिगृह प्रवेश

की नाही, हे तपासण्यासाठी संकेतस्थळ उघडल्यानंतर अर्ज भरण्यापूर्वी की-बोर्डवरील Ctrl + F5 ही कळ एकत्र दाबून पेज रिफ्रेश करावे, अशी सूचनाही देण्यात आली आहे. ज्या विद्यार्थ्यांची स्पॉट ॲडमिशनमध्ये अद्याप नोंदणी झालेली नाही, त्यांनी ज्या शासकीय वसतिगृहात प्रवेश घ्यायचा आहे, त्या वसतिगृहाच्या गृहपालांशी किंवा सहायक आयुक्त, समाज कल्याण कार्यालय, जालना येथे दि. २० ऑक्टोबर २०२६ पूर्वी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

**प्रवेश रद्द केल्यास स्वाधार योजनेचा लाभ मिळणार नाही**

शासकीय वसतिगृहासाठी अर्ज केलेल्या पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश क्षमतेअभावी वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, तर त्यांच्या अर्जाचा विचार नियमानुसार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी केला जाऊ शकतो. मात्र, वसतिगृहात प्रवेश मिळाल्यानंतर स्वतःहून प्रवेश रद्द करणाऱ्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेचा लाभ मिळणार नसल्याचे पत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे स्वाधार योजनेचा लाभ घेण्यास इच्छुक असलेल्या विद्यार्थ्यांनी शासकीय वसतिगृहासाठीचा अर्ज विहित मुदतीत भरणे आवश्यक आहे. स्पॉट ॲडमिशनसाठी यापुढे कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नसल्याचेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास विद्यार्थ्यांनी तातडीने संबंधित कार्यालयाशी संपर्क साधावा. सर्व विद्यार्थ्यांनी सुधारित वेळापत्रकाची नोंद घेऊन विहित मुदतीत अर्ज प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन सहायक आयुक्त, समाज कल्याण, जालना यांनी केले आहे.

**मंठा शहरात अवैध**

कारवाई करावी, अशी मागणी सुज्ञ नागरिकांमधून होत आहे. अवैध गॅस विक्री करणाऱ्यांचे परवाने रद्द करून कठोर कारवाई केल्यासच या धंद्याला आळा बसेल.
या प्रकरणी तहसीलदार आणि पुरवठा निरीक्षकांनी संयुक्त कारवाई करून शहरातील अवैध गॅस भरणा केंद्रांचा शोध घ्यावा, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

**बनावट एचएसआरपी**

रॉयल रेडियम, जालना येथील शेख परवेज शेख गणी (वय ३६) आणि एस.एन. टेक्नॉलॉजी, विशाल कॉर्नर, जालना येथील राहुल पंढरीनाथ मुननेश्वर (वय ४०) यांची नावे समोर आली. या दोघांनी बनावट एचएसआरपी नंबर प्लेट तयार करून दिल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. मशीनसह मोटारसायकल जप्त पोलिसांनी या कारवाईत एचएसआरपी नंबर प्लेट तयार करण्यासाठी वापरली जाणारी दोन लाख रुपये किमतीची मॅक्स पल हायड्रॉलिक मशीन, एक लाख रुपये किमतीची हिटिंग मशीन, रिबीट मशीन, ल्युमिनियमच्या नंबर प्लेट, होलोग्राम स्टिकर्स तसेच ३५ हजार रुपये किमतीची होंडा शाइन मोटारसायकल असा एकूण ३ लाख ३६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

या प्रकरणी कदीम जालना पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ६०२/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८ व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मोटारसायकल चोरीचे दुसरे प्रकरणही उघड

या तपासादरम्यान शेख राजेक याच्याकडून मोटारसायकल कोठून आणली, याबाबत चौकशी करण्यात आली. त्याने संबंधित मोटारसायकल सय्यद अल्ताफ सय्यद अहमद (वय २४, रा. नॅशनलनगर, जालना) आणि एका विधिसंघर्षग्रस्त बालकाकडून सन २०२४ मध्ये विकत घेतल्याचे सांगितले. पुढील चौकशीत ही मोटारसायकल राजूर, जालना येथून चोरी केल्याची माहिती समोर आली. या प्रकरणी हसनाबाद पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४८/२०२४ अन्वये भारतीय दंड विधानाच्या कलम ३७९ नुसार गुन्हा दाखल असल्याचे पोलिसांनी नमूद केले.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली कारवाई

पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक डॉ. विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व त्यांच्या पथकाने ही कारवाई केली.

चोरीच्या वाहनांना बनावट नंबर प्लेट लावून त्यांची ओळख लपविण्याचा प्रकार या कारवाईमुळे समोर आला असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे.

**इंदेवाडी येथील**

परिसरात संशयास्पद बॅग ठेवण्यात आल्याची माहिती जालना नियंत्रण कक्षातून बीडीडीएस पथकाला देण्यात आली. माहिती मिळताच पथकाने घटनास्थळी धाव घेत संशयास्पद बॅगची तपासणी करण्याची प्रक्रिया सुरू केली. श्वान नोरा व स्विटीच्या मदतीने तपासणी

संशयास्पद बॅगची प्राथमिक तपासणी करण्यासाठी श्वान नोरा व त्यांचे हँडलर अंमलदार खार्डे यांनी कार्यवाही केली. यावेळी श्वान नोराने बॅगमध्ये स्फोटक पदार्थ असल्याचा संकेत दिला. त्यानंतर अंमलदार रोहिदास देशमाने यांनी विविध उपकरणांच्या साहाय्याने बॅगची तपासणी केली. या तपासणीत बॅगमध्ये बॉम्बसदृश वस्तू असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर अंमलदार सुनील निळवंत यांनी आवश्यक उपकरणांच्या मदतीने संबंधित बॅग सुरक्षित ठिकाणी हलवली. पुढील कार्यवाहीदरम्यान अंमलदार रोहिदास देशमाने यांनी संशयास्पद बॅगमधील बॉम्बसदृश वस्तू बाहेर काढून मॅगझिनमध्ये ठेवली. त्यानंतर ही वस्तू वाहनाद्वारे एसडीए (डऊ-) परिसरात नेण्यात आली. विविध पथकांच्या उपस्थितीत प्रात्यक्षिक
या मॉक ड्रिलमध्ये बीडीडीएस पथकातील ऋझडख पाटील, हेड कॉन्स्टेबल शेवाळे, पोलीस कॉन्स्टेबल पैठणे, खरात तसेच श्वान स्विटी यांनी सहकार्य केले. यावेळी भू-अनुश्रवण केंद्रातील अधिकारी व अंमलदार, तालुका जालना पोलीस ठाण्याचे एपीआय चव्हाण, आरसीपी-२ चे हेड कॉन्स्टेबल चरावंडे तसेच इतर अंमलदार आणि पोलीस कॉन्स्टेबल खिजर उपस्थित होते. या मॉक ड्रिलच्या माध्यमातून संशयास्पद वस्तू आढळल्यास तातडीने प्रतिसाद देणे, श्वान पथक व आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने तपासणी करणे आणि संबंधित वस्तू सुरक्षितपणे हाताळण्याच्या प्रक्रियेचे प्रात्यक्षिक करण्यात आले.




# जिल्ह्यात २२ ऑक्टोबरपासून खत विक्रीसाठी एफएफएस प्रणाली अनिवार्य

जालना/प्रतिनिधी : जिल्ह्यातील शेतकऱ्यांना रासायनिक खतांची विक्री अधिक पारदर्शक, सुलभ आणि नियोजनबद्ध पद्धतीने करण्यासाठी केंद्र शासनाच्या 'Framework for Fertilizer Sale' (FFS) प्रणालीची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. जालना जिल्ह्यात २२ ऑक्टोबर २०२६ पासून या प्रणालीद्वारे खत विक्री प्रक्रिया राबविण्यात येणार असून, शेतकऱ्यांनी या नव्या पद्धतीची माहिती घेऊन त्यानुसार खत खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने केले आहे. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार रासायनिक खतांची खरेदी सुलभ, पारदर्शक आणि शेतकऱ्यांच्या गरजांनुसार करण्यासाठी ऋऋघ प्रणाली विकसित करण्यात आली आहे. ही प्रणाली मोबाईल ॲपवर आधारित असून, महाराष्ट्रात टप्प्याटप्प्याने तिची अंमलबजावणी करण्यात




येत आहे. पहिल्या टप्प्यात काही जिल्ह्यांत ही प्रणाली लागू केल्यानंतर आता जालना जिल्ह्यासह उर्वरित जिल्ह्यांतही तिची अंमलबजावणी केली जाणार आहे.

**Farmer ID किंवा आधार क्रमांकाच्या आधारे नोंदणी**

FFS प्रणालीद्वारे खत खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रथम मोबाईल ॲपच्या माध्यमातून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे Farmer ID

(पान ३ वर)

# इंदेवाडी येथील भू-अनुश्रवण केंद्रात बॉम्बसदृश वस्तू शोधण्याची मॉक ड्रिल

श्वान पथकाच्या मदतीने संशयास्पद बॅगची तपासणी; बीडीडीएस पथकाची प्रात्यक्षिकाद्वारे सज्ञता..

जालना/प्रतिनिधी : जालना येथील इंदेवाडी परिसरातील भू-अनुश्रवण केंद्रात बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या (बीडीडीएस) वतीने मॉक ड्रिल घेण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत संशयास्पद वस्तू आढळल्यास तातडीने कशा प्रकारे कार्यवाही करावी, याचे प्रात्यक्षिक या मॉक ड्रिलच्या



माध्यमातून सादर करण्यात आले.

या मॉक ड्रिलदरम्यान भू-अनुश्रवण केंद्राच्या परिसरात संशयास्पद बॅग ठेवण्यात आल्याची माहिती जालना नियंत्रण कक्षातून बीडीडीएस पथकाला देण्यात आली. माहिती मिळताच पथकाने घटनास्थळी धाव घेत संशयास्पद बॅगची तपासणी करण्याची प्रक्रिया सुरू केली. श्वान नोरा व स्विटीच्या मदतीने तपासणी

संशयास्पद बॅगची प्राथमिक तपासणी करण्यासाठी श्वान नोरा व त्यांचे हँडलर अंमलदार खार्डे यांनी कार्यवाही केली. यावेळी श्वान नोराने बॅगमध्ये स्फोटक पदार्थ असल्याचा संकेत दिला. त्यानंतर अंमलदार रोहिदास देशमाने यांनी विविध उपकरणांच्या साहाय्याने (पान ३ वर)

## मंठा शहरात अवैध गॅस विक्रीचा सुळसुळाट; प्रशासनाचे दुर्लक्ष - जीव धोक्यात

मंठा/प्रतिनिधी : मंठा शहरात सध्या अवैधरित्या गॅस विक्रीचा व्यवसाय जोमात सुरू असून काही दुकानदारांकडून छोट्या सिलेंडरमध्ये (५ किलो) बेकायदेशीरपणे गॅस भरून दिला जात आहे. हा प्रकार अत्यंत धोकादायक असून यामुळे मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नियमांना पायदळी तुडवून व्यवसाय प्राप्त माहितीनुसार, शहरातील काही दुकाने आणि गॅस भट्टी दुरुस्तीच्या दुकानांवर घरगुती १४.२ किलोच्या सिलेंडरमधून छोटे सिलेंडर भरून दिले जात आहेत. यासाठी कोणतीही सुरक्षा यंत्रणा, अग्निशमन व्यवस्था किंवा अधिकृत परवाना नसताना हा गोरखधंदा सुरू आहे. घरगुती गॅसचा व्यावसायिक वापर आणि तोही अशा असुरक्षित पद्धतीने करणे, हे कायद्याने गुन्हा आहे.

नागरिकांच्या जीवितास धोका

अशा प्रकारे गॅस भरताना गॅस गळती होऊन आग लागण्याची, स्फोट होण्याची भीती असते. दाट लोकवस्तीत सुरू असलेल्या या अवैध धंद्यामुळे परिसरातील नागरिक, शाळकरी मुले आणि महिलांच्या जीवितास धोका प्रशासनाने लक्ष देण्याची मागणी या प्रकाराकडे पुरवठा विभाग आणि अग्निशमन विभागाने तात्काळ लक्ष देऊन संबंधित दुकानदारांवर (पान ३ वर)




## राज्य उत्पादन शुल्क विभागाची मोठी कारवाई !




जालना/प्रतिनिधी : जालना जिल्ह्यात अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. मागील ९ महिन्यांच्या काळात विभागाने तब्बल १ हजार ७० कारवाया केल्या आहेत. या कारवाईदरम्यान १ हजार ५४ जणांना अटक करण्यात आली आहे. यावेळी दोन किंवा तीन गुन्हे दाखल असलेल्या ५० जणांकडून बॉण्ड लिहून




घेण्यात आले आहेत. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने अवैध दारूची विक्री करणाऱ्यांवर धडक मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेत अवैध वाहतूक आणि दारू निर्मितीसाठी वापरली जाणारी २३ वाहने जप्त करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, या संपूर्ण कारवाईत तब्बल १४ कोटी ७३ लाख ९ हजार ७३१ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या या धडक कारवाईमुळे अवैध दारू विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत. अशाच कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले.

इंदेवाडी येथील भू-अनुश्रवण केंद्रात बॉम्बसदृश वस्तू शोधण्याची मॉक ड्रिल

जालना : श्वान पथकाच्या मदतीने संशयास्पद बॅगची तपासणी; बीडीडीएस पथकाची प्रात्यक्षिकाद्वारे सज्जता..

जालना/प्रतिनिधी : जालना येथील इंदेवाडी परिसरातील भू-अनुश्रवण केंद्रात बॉम्ब शोधक व नाशक पथकाच्या (बीडीडीएस) वतीने मॉक ड्रिल घेण्यात आली. आपत्कालीन परिस्थितीत संशयास्पद वस्तू आढळल्यास तातडीने कशा प्रकारे कार्यवाही करावी, याचे प्रात्यक्षिक या मॉक ड्रिलच्या माध्यमातून सादर करण्यात आले. या मॉक ड्रिलदरम्यान भू-अनुश्रवण केंद्राच्या

(पान ३ वर)

## शिवसेना उद्योग सहकार सेनेच्या जालना जिल्हा उपप्रमुख पदी गणेश गायकवाड यांची नियुक्ती

जालना/प्रतिनिधी : शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष प्रमुख व मुख्य नेते उद्धव ठाकरे यांच्या आशीर्वादाने आणि मान्यवरांच्या मान्यतेने जालना जिल्ह्यात शिवसेनेच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळ मिळाले आहे. शिवसेना पक्षाच्यावतीने 'शिवसेना उद्योग सहकार सेनेच्या' जालना जिल्हा उपप्रमुख पदाची धुरा श्री. गणेश अण्णासाहेब गायकवाड यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. शिवसेना उद्योग सहकार सेनेचे जालना जिल्हाध्यक्ष श्री. पांडुरंग तुळशीराम पा. डोंगरे



यांच्या स्वाक्षरीने हे अधिकृत नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले आहे.

या नियुक्तीप्रसंगी पक्षाचे नेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार आणि शिवसेना खासदार, शिवसेना उपनेते व अंदाज समिती अध्यक्ष श्रीकांत शिंदे व शिवसेना सचिव अर्जुनभाऊ खोतकर, युवासेना सचिव महा.राज्य मा. संताजी मोरे आदींच्या सूचनेनुसार ही महत्त्वाची नियुक्ती करण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

## फुलंब्रीत अनुलोमच्या वतीने मातंग बांधवांच्या वस्तीमध्ये कन्यापूजन कार्यक्रम संपन्न नवरात्रीनिमित्त स्त्रीशक्तीचा सन्मान; सामाजिक समरसतेचा दिला संदेश

**नवनाथ गव्हाणे /बदनापूर** : नवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त अनुगामी लोकराज्य महाभियान (अनुलोम) यांच्या वतीने फुलंब्री भागातील प्रगतशील समाजातील मातंग बांधवांच्या वस्तीमध्ये कन्यापूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून स्त्रीशक्तीचा सन्मान, कन्येप्रती आदर आणि सामाजिक समरसतेचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमाला अनुलोमचे भागजनसेवक सुहास दुतोंडे यांची उपस्थिती होती. तसेच प्रगतशील समाजाचे नेतृत्व आकाश कांबळे उपस्थित होते. प्रा. अश्विन रांजणीकर सर आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, देवगिरी प्रांताचे



अध्यक्ष सुरेश मुंडे यांच्या हस्ते कन्यापूजन करण्यात आले. नवरात्रीच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून कन्येचा सन्मान म्हणजेच स्त्रीशक्तीचा सन्मान ही भावना अधोरेखित करण्यात आली. समाजातील विविध घटकांमध्ये आपुलकी, बंधुभाव आणि सामाजिक एकात्मता वाढीस लागावी, हा या उपक्रमामागील उद्देश होता. धार्मिक परंपरेला सामाजिक समरसतेची जोड देणाऱ्या या उपक्रमातून नवरात्रीचा उत्सव, स्त्रीशक्तीचा सन्मान आणि सामाजिक एकात्मतेचा संकल्प अधोरेखित झाला.

# जालना शहरातील श्री लक्ष्मीनारायण पंच मंडळाचा २१ वर्षांपासून नवरात्रोत्सवाचा अखंड जागर!

जालना/प्रतिनिधी : जालना शहरातील श्री लक्ष्मीनारायण पंच मंडळाच्या वतीने मागील २१ वर्षांपासून भव्य नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात येत आहे. धार्मिक श्रद्धा, भक्तीभाव आणि सामाजिक बांधिलकी जपत मंडळाने नवरात्रोत्सवाची परंपरा आजही कायम ठेवली आहे. या उत्सवादरम्यान विशेष पंचारती, गरबा-दांडिया, भजन आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते. विशेष म्हणजे, या उत्सवाला परिसरातील नागरिक आणि भाविकांचा दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, भक्तिमय वातावरणासोबतच युवक-युवती आणि लहान बालकांमध्येही मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.

श्री लक्ष्मीनारायण पंच मंडळाच्या वतीने आयोजित नवरात्रोत्सवात विशेष पंचारतीचे आयोजन केले जाते. या आरतीसाठी परिसरातील नागरिक आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात. ढोल-ताशांचा गजर, भक्तिमय वातावरण आणि देवीच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून जातो. आरतीनंतर युवक-युवती, लहान बालके तसेच आबालवृद्ध भाविक गरबा आणि दांडियामध्ये सहभागी



होत उत्सवाचा आनंद द्विगुणित करतात.

या नवरात्रोत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे शहरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांना आरतीचा मान दिला जातो. धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक बांधिलकी जपण्यावरही मंडळाचा विशेष भर असतो. शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप, विविध सांस्कृतिक कार्यक्रम, भजन आणि धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजातील सर्व घटकांना एकत्र आणण्याचे काम मंडळाकडून केले जाते. केवळ नवरात्रोत्सवापुरते मर्यादित न राहता, दरवर्षी २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनानिमित्तही (पान ३ वर)

# रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे आदिशक्तीचा जागर आणि महिला सक्षमीकरणाचा नारा

जालना/प्रतिनिधी : नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालनातर्फे आयोजित 'आदिशक्ती' हा कार्यक्रम शनिवार, दि. १७ ऑक्टोबर रोजी हॉटेल मधुबन येथे उत्साहात पार पडला. स्त्रीशक्तीचा सन्मान आणि गरजू महिलांना स्वावलंबी बनवण्याचा संकल्प करण्यात येऊन एस. आर. जे. पित्ती स्टील आणि कालिका स्टील्स यांच्या सीएसआर निधीतून गरजू महिला लाभार्थींना ३० शिलाई मशीन, १५ पिठाच्या गिरण्या, शाळा, कॉलेजमध्ये मुलींसाठी ७० सॅनिटरी




पॅड वेंडिंग मशीन, तसेच जवळच्या गावात सोलर स्ट्रीट लाइट्स यांचे वितरण केले जाणार आहे. या कार्यक्रमात प्राथमिक स्वरूपात प्रत्येकी २ महिलांना पिठाच्या गिरण्या आणि शिलाई मशीन प्रदान करण्यात आल्या. उर्वरित महिलांना त्यांच्या गावात जाऊन प्रदान करण्यात येणार आहे. याप्रसंगी व्यासपीठावर प्रमुख वक्त्या बालकल्याण समिती सदस्य सौ. विद्या लंके-कानडे उपस्थित होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून दानकुंवर महिला महाविद्यालयाच्या उपप्राचार्य पूजा अरोरा आणि अंकुशराव टोपे महाविद्यालयाच्या प्रा. डॉ. प्रियंका सेठिया, रोटरी क्लबचे अध्यक्ष प्रशांत महाजन, सचिव संदीप मुंदडा, प्रकल्प प्रमुख रमेश मगरे, एस. आर. जे. पित्ती स्टील कंपनीच्या प्रतिनिधी डॉ. वर्षा पित्ती, कालिका स्टील्सच्या प्रतिनिधी सरला अग्रवाल उपस्थित होत्या.

महिला सक्षमीकरण, आरोग्याविषयी जागरूकता आणि मुलींच्या शिक्षणाला बळ देणारा हा उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला रोटरी क्लबचे पदाधिकारी आणि सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बनावट एचएसआरपी नंबर प्लेट बनविणाऱ्या टोळीचा पर्दाफाश; चौघांविरुद्ध कारवाई

जालना । प्रतिनिधी : जालना जिल्ह्यात मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी सुरू केलेल्या मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. चोरीच्या मोटारसायकलींना बनावट हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) तयार करून लावून देणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश केला आहे. या प्रकरणात चार आरोपींची नावे समोर आली असून, पोलिसांनी एक मोटारसायकल आणि बनावट नंबर प्लेट तयार करण्यासाठी वापरली जाणारी यंत्रसामग्री



असा एकूण ३ लाख ३६ हजार ८५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. जालना जिल्हा पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांच्या सूचनेनुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव यांनी पथकाला मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्यांचा शोध घेण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला.

बनावट एचएसआरपी प्लेटचा संशय दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, शेख राजेक शेख मुबारक (वय २६, रा. संजयनगर, जालना) याने चोरीच्या होंडा शाइन मोटारसायकलला बनावट एचएसआरपी नंबर प्लेट लावल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानुसार पोलिसांनी तपास केला असता संबंधित मोटारसायकलच्या नंबर प्लेटसह इंजिन व चेसिस क्रमांकांची पडताळणी करण्यात आली. यावेळी नंबर प्लेट बनावट असल्याचा संशय बळावला. या प्रकरणाचा पुढील तपास करताना संबंधित नंबर प्लेट कोणी तयार करून दिली, याची चौकशी करण्यात आली. त्यातून (पान ३ वर)